कोरोनाच्या पार्श्वभूमीवर...

# कृषी पणन संधी व कायदेशीर तरतुदी

श्री. सुनिल पवार, व्यवस्थापकीय संचालक, कृषी पणन मंडळ, पुणे

कोरोना ही काही मानवावर कोसळलेली पहिलीच विध्वंसक आपत्ती नाही. अगदी इसवी सन पूर्व काळापासून प्रचंड जिवीतहानी घडवणाऱ्या आपत्तींचा मोठा इतिहास आहे. प्लेग, फ्लू, कॉलरा, एचआयव्ही आदी आजारांमुळे वेळोवेळी लाखो लोकं मृत्यूमुखी पडली. मात्र अशा काळात घाबरुन न जाता आपत्तीचे रुपांतर इष्टापत्तीत करत मानवाने वेगवेगळे शोध लावले आणि पुढील प्रगतीची पायाभरणी केली. विनाशकारी पहिल्या महायुद्ध काळात सॅनिटरी टॉवेल्स, टी बॅग, स्टेनलेस स्टील, कपड्यांवरील चैन आदी अनेक गोष्टींचा शोध लागला. दुसऱ्या महायुद्धातही कोट्यवधी लोकांचा मृत्यू झाला. मात्र याच काळात पेनिसिलीन, संगणकाची संकल्पना, बॉलबेन, जेट इंजीन, फोटोकॉपी अशा अनेक क्रांतीकारक गोष्टींचा शोध लागला. सध्याच्या कोरोना आपत्तीच्या काळातही भविष्यातील प्रगतीच्या संधी दडलेल्या आहेत.

मॉस्लो या जगविख्यात मानसशास्त्रज्ञाचा मानवी गरजांचा पिरॅमीड प्रसिद्ध आहे. सर्वोच्च टोकाचं प्राधान्य आत्म सन्मानाला त्यानंतर आदर, सामाजिक बाबी, सुरक्षा व सर्वात शेवटी अन्न, वस्त्र, निवारा आदी मुलभूत शारिरिक गरजांचा क्रम सर्वात शेवटी होता. सध्याच्या कोरोनाच्या काळात मॉस्लोचा पिरॅमीड उलटा झाला. आत्मसन्मान तळाला गेला व अन्नाची गरज सर्वोच्च स्थानी आली. शेती व शेती संबंधीत व्यवसायांच्या भविष्याच्या अनुषंगाने ही फार महत्वाची बाब आहे.

कोरोनाने आपल्याला विस्मयचकीत करणारे अनेक धडे दिले आहेत. विमानसेवा, रेल्वे, हॉटेल, सिनेमागृहे, कार्यालये पूर्ण बंद झाली. 97 टक्के जनता घरात बसली. जगात हे असं पहिल्यांदा झालं. जुनी गृहीतके मोडीत निघून नव्या संकल्पना, नवी व्यवस्था कोरोना काळात रुढ होताना दिसते आहे. आरोग्यदायी सवयींबाबत प्रचंड जागरुकता झाली आहे. घरी बसून काम करणं, ई बैठका, वेबसेमीनार, तुम्ही कितीही मोठी व्यक्ती असला तरी स्वतःचं काम स्वतः करणं आदी अनेक बदल घडून आले. आपत्तीत तग धरुन भविष्यात प्रगती करायची असेल तर स्वतःत बदल करावाच लागेल हे सर्व पातळ्यांवर स्विकारले जात आहे. काळानुसार बदल न केल्याने एचएमटी, कोडॅक, नोकिया अशा अनेक बड्या कंपन्या कालबाह्य झाल्या. शेती व संलग्न व्यवसायिकांनाही काळाची पावले ओखळून बदल करावे लागतील.

नवीन बदल स्विकारताना, व्यवसाय सुरु करताना भांडवल नाही, बॅंका कर्ज देत नाही अशी कारणे सांगितली जातात. पण कल्पकता असेल तर भांडवलाशिवायही व्यवसाय उभारता व यशस्वी करता येतो हे ओला, अमेझॉन, ओयो, वॉट्सअप आदी आजच्या अग्रणी उद्योगांनी दाखवून दिले आहे. कोरोनाने अनेक क्षेत्रातील तृटी, बलस्थाने स्पष्ट केली आहेत. त्या आधारे बदल करत, स्विकारत पुढे जायला हवे.

कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे शेतमालाची पुरवठा साखळी पूर्णतः विस्कळीत झाली. जिवनावश्यक गोष्टींच्या पुरवठ्याचे आव्हान निर्माण झाले. अन्न पुरवठा ही प्रमुख बाब बनली. कोरोनाने शिकवलं... तुमच्याकडे वाहन, टीव्ही, फ्रीज नसेल तरी चालेल. पण खायला अन्न पाहिजे. अन्न पुरवठा ही शाश्वत संधी असल्याचं स्पष्ट झालं.

भारताची 130 कोटी लोकसंख्या म्हणजे 40 कोटी कुटुंब गृहीत धरली आणि प्रत्येक कुटुंबाचा अन्नावरील मासिक खर्च 3000 रुपये धरला तरी महिन्याला एक लाख 20 हजार कोटी रुपयांची शाश्वत बाजारपेठ आपल्या हातात आहे  द्राक्ष, डाळींब, कांदा उत्पादनात आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. केळी, संत्रा व एकूण फळ उत्पादनात देशात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. ज्वारीत उत्पादनात पहिल्या तर सोया, तूर उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. फळे, भाजीपाला, अन्नधान्यासह सर्वच कृषी उत्पादनांमध्ये मोठा वाव आहे.

**- ग्राहकांच्या मानसिकतेत बदल**

कोरोना कालावधीत ग्राहकांमध्ये शेतमालाच्या गुणवत्तेबाबत जागरुकता निर्माण झाली. हॉटेलचे खाद्यपदार्थ नाकारुन निरोगी, स्वच्छ, प्रतिकार क्षमता वाढवणारे घरगुती, साधे अन्न, परंपरागत खाद्यान्न, आयुर्वेदिक व वनौषधी उत्पादने, सेंद्रीय, रसायनमुक्त व वैद्यकीय गुणधर्म असलेल्या शेतमालाची मागणी व वापर वाढला. संत्रा उत्पादकांना दुप्पट दर मिळाले. परदेशातही मसाल्याच्या पदार्थांची मागणी वाढली, निर्यातीस संधी निर्माण झाल्या. गर्दीत जायची भिती वाटत असल्याने ग्राहकांना आता घरपोच शेतमाल मिळण्याची सवय लागणार आहे.

**- नवीन तंत्रज्ञानाचा स्विकार**

एरवी नवीन तंत्रज्ञानाला फारसा प्रतिसाद मिळत नसताना कोरोनामुळे निर्माण झालेल्या स्थितीत शेतकऱ्यांनी स्वतःहून ग्रेडींग, सॉर्टिंग, पॅकिंग, ब्रॅन्डींग केलं. क्रेट, बॉक्सचा वापर मोठ्या प्रमाणात सुरु झाला. वॉट्सअपवर शेतमालाच्या जाहिराती करत ब्रॅन्डिंगवर जोर देण्यात आला. मार्केट इंटिलीजन्सचा (अज्ञात बाजाराचा शोध घेवून ती काबीज करणं) फार चांगला वापर या काळात झाला. परराज्यातील बाजारपेठेची माहिती घेवून शेतकऱ्यांनी इतर राज्यात माल पाठवला. बांग्लादेशात संत्रा निर्यात झाली. कृषी पणन मंडळामार्फत सर्व विभागांच्या समन्वयाने आंतरराज्य शेतमाल वाहतूक नियंत्रण कक्ष 24 तास सुरु ठेवण्यात आला. आता केंद्र सरकारही मार्केट इंटलिजन्सबाबत एक वेगळी यंत्रणा तयार करत आहे.

**- ऑनलाईन शेतमाल व्यापार वाढ**

लॉकडाऊन सुरु झाल्यापासून शेतमालाचे ऑनलाईन ट्रेडींग मोठ्या प्रमाणात सुरु झाले. मोबाईल संदेश, वॉट्सअप, वेगवेगळया अपचा वापर करुन ग्राहकांकडून खुप मोठी मागणी नोंदवण्यात आली आणि त्यानुसार थेट ग्राहकांना शेतमाल पुरवठा झाला. ई पेमेंट व्यवस्था शेतकऱ्यांनी आपलीशी केली. आंब्याची खरेदी विक्री ऑनलाईन झाली. गेल्या शंभर वर्षात पहिल्यांदा आंबा अडत्याविना थेट विकला गेला आणि शेतकऱ्यांना दुप्पट पैसा मिळाला. याशिवाय अनेक शेतकऱ्यांनी स्विगी, झोमॅटो अशा थेट सेवा पुरवठादार कंपन्यांसोबत भागिदारी केली. त्यामार्फत 10 ते 20 लाख ग्राहकांना थेट शेतमाल पुरवठा करण्यात आला.

**- लॉकडाऊनमधील यशोगाथा**

शेतकरी, शेतकरी गट, उत्पादक कंपन्या, सहकारी संस्थांनी मुंबई, पुणे, नाशिक येथे शेकडो टन शेतमाल थेट घरपोच केला. दलाल कमी व्हावेत, थेट शेतमाल विक्री व्हावी असं नेहमी म्हटले जायचे. कोरोनाच्या काळात हे प्रत्यक्षात आलं. मराठवाडा, विदर्भातील उत्पादक कंपन्याही मोठ्या प्रमाणात पुढे आल्या. विना मध्यस्त पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला. यातून राज्यभर अनेक यशोगाथा घडल्या व घडत आहेत.

**- निर्यात व प्रक्रिया**

निर्यातीच्या आघाडीवरही अनेक बदल झाले आहेत. अनेक उत्पादनांची निर्यात नेहमीपेक्षा जास्त झाली. निर्यातदारांनी थेट शेतकरी, उत्पादक कंपन्यांशी संपर्क साधून माल खरेदी केला. शेतकरी व निर्यातदारांची थेट सांगड घातली गेली. ट्रेसिबिलीटी खुप सोपी होवून त्यास खुप वेगाने चालना मिळाली. शेतकऱ्यांना प्रक्रियेचे महत्व कळले. शिल्लक राहिलेल्या मालाचे मुल्यवर्धन सुरु झाले. सांगलीत बेदाणा, कोकणात बिगर हापूस आंब्याचा पल्ब करुन ठेवण्यात आला. अनेक शेतकरी, गट, कंपन्यांनी कोरोनाच्या काळात अतिशय उत्कृष्ट काम करुन दाखवले.

**- राज्यातील कृषी पणन व्यवस्था**

सध्या राज्यातील 306 मुख्य व 596 उपबाजारांमध्ये फळे, भाजीपाला, अन्नधान्यांची 2047 लाख क्विंटल आवक तर पन्नास हजार कोटीची उलाढाल होते. याशिवाय 63 खासगी बाजार व 1100 थेट पणन परवान्यांच्या माध्यमातून 15 हजार कोटींची उलाढाल होते. म्हणजेच सुमारे 65 हजार कोटी रुपयांची कृषी पणन उलाढाल दिसून येते. शासनाने 2016-17 पासून ई नाम खरेदी विक्री व्यवस्था आणली. त्यात 12 लाख शेतकरी व 17 हजार खरेदीदारांची नोंदणी झाली आहे. अद्याप ही योजना बाजार समित्यांमध्ये आहे. यापुढे ऑनलाईन ट्रेडिंग वाढत जाईल.

**- केंद्राचे अध्यादेश व बदलती बाजार व्यवस्था**

केंद्र शासनाने 5 जुन 2020 रोजी लागू केलेल्या तीन अध्यादेशांमुळे शेतकऱ्यांना बाजार व्यवस्थेचे सर्व पर्याय खुले होणार असल्याने देशातील कृषी पणन व्यवस्था मोठ्या बदलांना सामोरी जाणार आहे. बाजार समितीच्या आवारातच खरेदी विक्रीचे व त्याबाहेरील खरेदी विक्रीसाठी परवान्यांचे बंधन काढून टाकण्यात आले आहे. शेतमालाची साठा मर्यादा उठवली आहे. शेती करारांमध्ये पशुधन व शेतीसंलग्न सेवांचाही समावेश झाला आहे. केंद्राचे अध्यादेश लागू होताना राज्याचेही कृषी पणन कायदे अस्तित्वात राहणार आहेत. कोणत्या कायद्याने व्यवहार करायचा याचे स्वातंत्र्य संबंधितांना असेल. या अध्यादेशांतील तरतुदींच्या अनुषंगाने सध्या अनेक मुद्दे, प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या अध्यादेशांचे कायद्यात रुपांतर होताना त्यावर बरीच चर्चा होईल. त्याचे नियम बनविण्यात येतील. त्यांचे सध्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

**1) शेती उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुविधा) अध्यादेश, 2020**

करार शेती आपल्याकडे पुर्वीच कायद्यात आली होती, पण त्यातील तरतूदी खुप क्लिष्ट असल्याने फारसे यश मिळाले नाही. या पार्श्वभूमीवर केंद्राने हा अध्यादेश आणलाय. यात शेती सोबत संलग्न व्यवसायांचे, त्यातील व्यवहार व सेवांचेही करार करता येणार आहेत. शेतमालाच्या करारासंदर्भात राष्ट्रीय चौकट उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांना व्यवसायिक कंपन्या, प्रक्रियादार, घाऊक विक्रेते, निर्यातदार किंवा शेती सेवांसाठी भागिदारी करता येईल. शेतमालाच्या विक्रीसंदर्भात हंगामापूर्वी कंपन्यांशी करार करता येईल. यात शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्थांना शेतकऱ्याचा दर्जा देण्यात आला आहे.

**2) शेतकरी (सबलीकरण आणि संरक्षण) हमी भाव, करार आणि शेती विषयक सेवा अध्यादेश, 2020**

शेतकरी वा कंपन्यांना स्वतःचे इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग आणि ट्रान्झॅक्शन प्लॅटफॉर्म स्थापन करता येतील. शेतकरी त्याचा शेतमाल कुठेही कुणालाही विकू शकतो. त्यावर कुठलीही फी लागू होणार नसल्याने शेतकऱ्याला मालाच्या विक्रीची 100 टक्के रक्कम मिळेल. यातून  पर्यायी पुरवठा साखळ्या, नवीन स्टार्टअप, प्रक्रिया उद्योगांचे स्वतःचे जाळे तयार होईल. कमोडिटी एक्स्चेंजेस व ई स्पॉट लिलावास चालना मिळेल. शेतकऱ्यांसाठी शेतमाल किंमत माहिती आणि मार्केट इंटिलीजन्स व्यवस्था, व्यवहार विषयक वाद निराकरण यंत्रणा यांचीही तरतूद यात आहे. वाद निर्माण झाल्यास उपविभागिय दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करुन समन्वय मंडळाच्या माध्यमातून सामंजस्याने तोडगा काढण्याची तरतूद आहे. केंद्राच्या पोर्टलवर नोंदणी करणे व पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे.

**3) अत्यावश्यक वस्तू अध्यादेश, 2020**

अत्यावश्यक वस्तू कायदा हा इंग्रजांच्या काळचा व ग्राहकाभिमूख होता. ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त साठा करता येत नसल्याने प्रक्रिया उद्योगांना फटका बसत होता. खरेदीदार, निर्यातदारांना कमी दर असताना जास्त खरेदी करुन साठवता येत नव्हते. यामुळे पायाभूत सुविधांचाही फारसा विकास होत नव्हता. स्पर्धा वाढावी व त्याला लाभ शेतकऱ्यांना व्हावा म्हणून केंद्रातील यातील साठा मर्यादा काढून टाकली आहे. मात्र नाशवंत मालाचे भाव मागील 12 महिन्यांच्या भावाहून दुप्पटीने आणि अनाशवंत मालाचे भाव दीड पटीने वाढले तर पुन्हा साठा मर्यादा आणता येईल, अशी तरतूद त्यात ठेवण्यात आली आहे.

**- बाजार समित्यांनी द्यावी घरपोच सेवा**

राज्य सरकारच्या अखत्यारितील बाजार यंत्रणेला केंद्राचा कायदा लागू नाही. मात्र यामुळे बदलणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी बाजार समित्यांना आता स्वतः बदलावं लागणार आहे. प्रसंगी दुध संघाप्रमाणे शेतकऱ्यांच्या शेतावर गाड्या पाठवून माल गोळा करावी लागेल. घरपोच सेवा द्यावी लागेल. असे नवनवे प्रयोग केले तर बाजार समित्यांना अडचण येणार नाही.

**- भविष्यातील संधी...**

कोरोना कालावधीत स्पष्ट झालेल्या बाबी, घडत असलेले बदल व बाजार व्यवस्थेत होत असलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व व्यवसायिकांना अनेक संधी आहेत. उत्पादक ते ग्राहक पुरवठा साखळी निर्माण करणे ही खुप मोठी संधी आहे. अमेझॉन सारख्या अनेक मोठ्या कंपन्या त्यात उतरत आहेत. पायाभूत सुविधा, वाहतूक, शीतगृहे, पॅकहाऊसेस, प्रयोगशाळा उभारणी, सेंद्रीय, पारंपरिक व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारे खाद्यान्न, रेडी टू इट किंवा रेडी टू कुक प्रकारचे अन्न, हुरड्यासारखे घरगुती खाद्यपदार्थ निर्मिती व पुरवठा यात नव्या संधी खुल्या होत आहेत. बाजाराच्या मागणीनुसार सातत्याने शेतमाल पुरवठा होण्यासाठी अग्रीगेटर म्हणून काम करण्यास मोठा वाव आहे. ई प्लॅटफॉर्म आणि इ पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ग्राहकांची कमतरता नाही. राज्यात दोन लाख सहकारी संस्था आहे. त्यापैकी एक लाख हाऊसिंग सोसायट्यांची सर्विस्तर माहिती उत्पादकांसाठी उपलब्ध आहे. उत्पादक कंपन्यांमार्फत त्यांना शेतमाल पुरवठा सुरु झाला आहे. याशिवाय मुल्यवर्धन व पुरवठा साखळीत अनेक टप्पे असतात. त्यातही नवनवीन व्यवसाय सुरु होऊ शकतात. शेतकरी व व्यवसायिकांनी काळाची पावले ओळखूण या संधींचा लाभ घ्यायला हवा.

\- - - -